

अजित पवार यांच्या परिवार मिलन कार्यक्रमास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगलवार दिनांक 23/09/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 223 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# पंतप्रधानांकडून 'जीएसटी'तील दरकपातीचे फायदे अधोरेखित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



नवी दिल्ली : वस्तू व सेवा करातील (जीएसटी २.०) नवी द्विस्तरीय दररचना सोमवारपासून (दि.२२) लागू होत आहे. अप्रत्यक्ष करातील ही सुधारणा म्हणजे 'बचत उत्सव' असून त्यामध्ये देशवासीयांना सहभागी होण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरचित्रवाणीवरून रविवारी देशाला उद्देशून केलेल्या वीस मिनिटांच्या भाषणामध्ये केले.केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षापासून वार्षिक १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त केले आहे.

शिवाय, 'जीएसटी २.०'च्या सुलभीकरणामुळे दैनंदिन वापराच्या ९९ टक्के वस्तू ५ टक्के कर टप्प्यात आल्या आहेत. या दोन्हींचा एकत्रित परिणाम पाहिला तर गेल्या वर्षभरात जनतेची २.५ लाख कोटी रुपयांहून अधिक बचत होऊ शकेल. त्याचा सर्वाधिक लाभ गरिबीतून आत्ताच बाहेर आलेल्या २५ कोटी नव मध्यमवर्गाला होणार असल्याचा दावा मोदींनी केला. 'जीएसटी'तील नवी सुधारणांमधून 'नागरिक देवो भव' हा मंत्र दिला आहे, असा दावा मोदींनी केला.'जीएसटी'चे शून्य, ५, १२, १८ व २४ टक्के असे पाच दरटप्पे होते. त्यामध्ये नुकतेच सुलभीकरण करण्यात आले असून ५ व १८ हे दोनच दरटप्पे कायम ठेवण्यात आले आहेत. अन्नपदार्थ, औषधे, साबण, टूथब्रश, टूथपेस्ट, आरोग्य व जीवनविमा अशा अनेक वस्तूंवर करमाफ असेल वा फक्त ५ टक्के कर आकारला जाईल. 'जीएसटी'चे दर कमी झाल्यामुळे लोकांना वैयक्तिक स्वप्ने पूर्ण करणे सोपे होईल.

मग, ते घर बांधणे असो, टीव्ही वा फ्रीज खरेदी करणे असो वा स्कूटर, बाइक, कार खरेदी करणे असो. या वस्तू आता त्यांना स्वस्तात मिळू शकतील. सर्वसामान्यांना प्रवासही परवडणारा असेल.

कारण बहुतांश हॉटेल खोल्यांवरील जीएसटीचे दर कमी झालेले आहेत, असे सांगत मोदींनी देशांतर्गत बाजारपेठेला चालना मिळण्याचा आशावाद व्यक्त केला.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई!

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : राज्यात अतिवृष्टीमुळे ६६ लाख एकर क्षेत्राचे नुकसान झाले असून या नुकसानीचे पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई दिली जाईल,' असे आश्वासन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. संकटकाळात शेतकऱ्यांनी घाबरून जावू नये. राज्य सरकार शेतक-यांच्या पाठीशी आहे, असेही भरणे यांनी सांगितले.द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या ७० व्या वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाच्या उद्घाटन दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिजित पाटील, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकचे प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त दीपक तावरे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. शेखर गायकवाड, द वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे, द साऊथ इंडियन शुगरकेन अँड शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एन. चिनप्पन, द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष एस. बी. भड, उपाध्यक्ष सोहन शिरगावकर यावेळी उपस्थित होते.'देशात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला उच्चांकी दर देणाऱ्या साखर कारखान्यांच्या कामकाजाची माहिती घेऊन इतर साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचा उसाला अधिकाधिक दर देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव, कामगारांना वेळेत वेतन, बोनस देणाऱ्या साखर कारखान्यांना राज्य शासनाच्यावतीने सहकार्य येईल,' असे भरणे यांनी स्पष्ट केले.

# लघुउद्योजकांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी अजित पवार यांचे निर्देश!

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



REGISTRATION NO.: F-1597 Dt. 21-8-1980
Pimpri Chinchwad Small Industries Association
पिंपरी - चिंचवड लघुउद्योग संघटना

पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात लघुउद्योजकांना येणाऱ्या विविध समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेमार्फत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बैठकीसाठी पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेमार्फत मागणी केली असता त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना एक संयुक्त बैठक घेण्याचे निर्देश दिले.

पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात लघुउद्योजकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, औद्योगिक विकास महामंडळ, महावितरण व पोलिस विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पी. एम. आर. डी. ए. या विभागाविषयी येणाऱ्या समस्यांचे शनिवार दि. २०/०९/२५ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार पिंपरी चिंचवडमध्ये आले असता त्यांना पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेमार्फत निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, सचिव जयंत कड, संचालक नवनाथ वायाळ, भारत नरवडे उपस्थित होते. मा. उपमुख्यमंत्री यांनी निवेदन स्वीकारून वरील विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांना लवकरात लवकर एक संयुक्त बैठक घेण्याचे निर्देश दिले.

**पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात लघुउद्योजकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, औद्योगिक विकास महामंडळ, महावितरण, पोलिस विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पी. एम. आर. डी. ए. यांचे विषयी येणाऱ्या समस्या खालीलप्रमाणे -**

कुदळवाडी, चिखली परिसरातील लघुउद्योजकांची आहे तीच जागा विकसित करून औद्योगिक पार्क बनविणे.

कुदळवाडी, चिखली परिसरातील लघुउद्योजक हे गेली 25 ते 30 वर्षापासून ग्रामपंचायत काळापासून ग्रामपंचयातीचा रितसर परवाना घेऊन उद्योग व्यवसाय करत होते.

महापालिकेने केलेल्या कारवाईमुळे सदर परिसरातील उद्योजकांचे व कामगारांचे फार मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. कामगार बेकार झाले. उद्योजकांचे आर्थिक गणित कोलंमडून पडले आहे. उद्योजक देशोधडीला लागलेला आहे. उद्योजकाचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे. त्याने घेतलेल्या कर्जाचे हप्ते तो वेळेवर देऊ शकत नाही.

पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरात औद्योगिक महामंडळाच्या जागाच शिल्लक नाहीत तसेच जागेचे रेट हे गगनाला भिडलेले आहेत. त्यामुळे या परिसरात लघुउद्योजकाना जागा घेणे आता तरी शक्य नाही. चाकण परिसरात देखील कामगार मिळने मुश्किल होत आहे तसेच वाहतुकीचा प्रश्न देखील उद्भवत आहे.

चिखली, कुदळवाडी परिसरातील जागा या उद्योजकांच्या स्वत:च्या मालकीच्या असून त्यावर महानगरपालिकेनी केलेली बेकायदेशीर बांधकाम पाडण्याची कारवाई ही फार अन्यायकारक झालेली आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उद्योजकांच्या ७/१२ उताऱ्यावर असणारी जेवढी जागा आहे तेवढी औद्योगिक विकसित झोन निर्माण करून याच विकसित जागेत औद्योगिक पार्क करून बांधकाम, सी. इ. पी. टी., एस. टी. पी. प्लांट, रोड, ड्रेनेज, एम. एस. इ. बी. पावर, पथदिवे, सहित तयार करून देणे.

वरील परिसरात झालेल्या निष्कासन कारवाई नंतर तेथील जागा मालकांना जागा विकासीत करण्यासाठी, जमीन मोजणी करण्यासाठी अर्ज स्वीकारले जात नाही पिंपरी चिंचवड महानगरपालिका व भूमी अभिलेख यांच्यात समन्वयाचा अभाव आहे तो दूर करून जमीन मालकांना जागा विकसित करण्यासाठी महानगरपालिकेने सर्व मदत करावी. तरी महानगरपालिकेने वरील परिसरात औद्योगिक पार्क बनवून उद्योजकांचे पुनर्वसन करून उद्योजकाचे झालेले आर्थिक नुकसान हे महानगरपालिकेने व राज्य शासनाने भरपाई करून द्यावे.

# शहरातील युवकांचा 'आप' मध्ये प्रवेश!

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील शिवकुमार बसवराज बनसोडे यांनी आम आदमी पार्टीत प्रवेश केला. समाजकारणाशी निष्ठा आणि जनतेच्या प्रश्नांशी बांधिलकी जपणारे कार्यकर्ते शिवकुमार बसवराज बनसोडे यांनी आज आम आदमी पार्टीत प्रवेश केला.

हा पक्षप्रवेश सोहळा आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहर प्रवक्ते सुरेश गायकवाड आणि शहराध्यक्ष रविराज काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.




या प्रसंगी विकी पासोटे यांच्या नेतृत्वाखाली बनसोडे यांनी पक्षाचा झेंडा स्वीकारत आम आदमी पार्टीच्या विचारधारेबद्दल आपला विश्वास व्यक्त केला.यावेळी बोलताना बनसोडे म्हणाले की, “सामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि पारदर्शक, स्वच्छ राजकारण घडविण्यासाठी आम आदमी पार्टीचाच मार्ग योग्य आहे. मला या पक्षाच्या विचारांशी आणि कार्यपद्धतीशी आत्मीयता वाटते.”याच सोबत सोनू बाळासाहेब हिंगे, मयूर अशोक गंगावणे, नागेश बसवराज गायकवाड, लक्ष्मण भाजपा शिवशरण आणि प्रवीण केंजळे यांनी देखील आम आदमी पार्टीत प्रवेश करून पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवण्याची ग्वाही दिली.

त्यांच्या प्रवेशामुळे पक्षाच्या संघटनात्मक कार्याला नवी ऊर्जा मिळणार असून, पिंपरी चिंचवड शहरातील जनतेपर्यंत आम आदमी पार्टीची भूमिका अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास शहराध्यक्षांनी व्यक्त केला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगलवार दिनांक 23/09/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शहरातील समस्या सोडविण्याची अजित दादांची ग्वाही

## 'राष्ट्रवादी परिवार मिलन' कार्यक्रमात फुले नगर येथे नागरिकांशी साधला संवाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : फुले नगर येथील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होतो तसेच येथे नागरी सुविधा बाबत राष्ट्रवादी काँग्रेस असंघटित विभागाचे शहराध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी दिलेल्या निवेदनातील सर्व समस्या सोडविण्याचे काम मी आणि माझी टीम करेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. रविवारी 'राष्ट्रवादी परिवार मिलन' कार्यक्रमात अजित पवार यांनी फुले नगर येथे नागरिकांशी संवाद साधला. यावेळी विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष योगेश बहल, राष्ट्रवादी काँग्रेस असंघटित विभागाचे



शहराध्यक्ष रवींद्र ओव्हाळ, रवि काची, सादिक खान, जफर शेख, अशोक भडकुंबे, सुनिल गवांदे, अमोल मिसाळ, चंदू हलगी, चंद्रकांत बच्चे पाटील, मिनाक्षी ओव्हाळ, लक्ष्मी फुलारी, संगीता भारती, दीपा मुरकुटे, प्रतिभा वानखडे, संगीता खरात, पल्लवी कांबळे, दीपक साकोरे, माऊली मोरे, मल्लिकार्जुन फुलारे, हारून मुजावर, सुनील अडगळे, महादेव अडागळे आदींसह परिसरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. यावेळी महिला भगिनींनी अजित पवार यांचे औक्षण केले. रवींद्र ओव्हाळ यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अजित पवार म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी मला २५ वर्ष साथ दिली. त्यामुळे मी या शहराचा विकास करू शकलो. देशातील अग्रगण्य शहर म्हणून पिंपरी चिंचवड शहर ओळखले जावे यासाठी आणखी अनेक कामे करायची आहेत. त्यासाठी पुन्हा एकदा मला साथ द्यावी. मी माझ्या सर्व टीमला सोबत घेऊन पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्टीतील नागरिकांना चांगली घरे देणे, नियमित वीज पुरवठा देण्याची व्यवस्था करणे, मेट्रो चा विस्तार करणे, शहरातील सर्व भागासह झोपडपट्टीतील घरांनाही नियमित शुद्ध पाणी पुरवठा, रिंग रोड पूर्ण करणे, कायदा सुव्यवस्था सुरळीत ठेवणे असे सर्व प्रश्न सोडविण्याची ग्वाही देतो. त्यासाठी पुढील काळात मला साथ द्या असे आवाहन अजित पवार यांनी उपस्थितांना केले. यावेळी युवकांनी अजित पवार आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा दिल्या. विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष योगेश बहल यांनीही सर्व प्रश्न अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सोडवू असे सांगितले.

# नवरात्रोत्सवात 43 सराइतांची कारागृहात रवानगी



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : नवरात्रोत्सवात सराइतांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. परिमंडळ एकमधील ४३ आरोपींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली.पुणे पोलिसांच्या परिमंडळ एकमध्ये शिवाजीनगर, खडक, विश्रामबाग, फरासखाना, समर्थ आणि डेक्कन पोलीस ठाण्यांचा समावेश होतो. नवरात्रोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त ऋषिकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली ४३ सराइतांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.कारवाई करण्यात आलेल्या सराइतांविरुद्ध बेकायदा शस्त्र बाळगणे, बेकायदा दारू विक्री, खुनाचा प्रयत्न असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

त्यापैकी काही जण गुंड टोळ्यांशी संबंधित आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त रावले यांनी दिली.नाना पेठेतील टोळीयुद्धातून आयुष कोमकर याचा खून करण्यात आल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली होती. त्यानंतर कोथरूड भागात नीलेश घायवळ टोळीतील सराइतांनी एकावर पिस्तुलातून गोळीबार केला, तसेच या भागात दहशत माजविण्यासाठी एका तरुणावर कोयत्याने वार केले होते.

गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर शहरातील सराइतांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

# जुगार खेळण्याच्या वादातून बिजलीनगर येथे एका युवकाचा भर दिवसा खून




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील बिजलीनगर येथे धक्कादायक घटना घडली आहे. मित्रांबरोबर जुगार खेळण्याच्या वादातून एका युवकाचा भरदिवसा खून करण्यात आला. बिलीनगर येथील नागसेन नगर झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या वैभव थोरात (वय २५) याचा जुगाराच्या वादातून त्याच्याच चार मित्रांनी मिळून त्याचा खून केला.

वैभव थोरात याचा जागीच मृत्यू झाला असून चारही संशयित आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.चिंचवडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंकुश बांगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवार (दि.२२) सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजता बिजलीनगर आकुर्डी येथे आकुर्डी रेल्वे स्टेशन शेजारी असलेल्या नागसेन नगर झोपडपट्टीमध्ये वैभव थोरात व त्याच्या ओळखीचे चार जण अनिल बनसोडे, महेश कोळी, शिवम वाळुंखे, योगेश गायकवाड हे सर्वजण जुगार खेळत होते. काही वेळानंतर जुगार खेळण्याच्या वादातून त्यांच्यामध्ये भांडणे सुरू झाली आणि याच भांडणातून वैभव थोरात यांच्यावर या चौघांनी धारदार शस्त्राने वार केले. या घटनेत वैभवचा जागीच मृत्यू झाला. ही माहिती मिळताच चिंचवड पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि चारही संशयित आरोपींना पोलिसांनी अटक केली. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंकुश बांगर करत आहेत.

# अजित पवार यांच्या परिवार मिलन कार्यक्रमास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी नुकतेच जनसंवाद कार्यक्रमात पिंपरी चिंचवड शहरातील अनेक समस्या जाणून घेतल्या व बहुतांश समस्यांचे निराकरण केले तसेच पिंपरी चिंचवड शहरात अजित पवार यांच्या वतीने परिवार मिलनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

पिंपरी चिंचवड शहर आणि अजित पवार यांचे नाते मागील तीन दशकापासून अबाधित आहेत. पिंपरी चिंचवड शहराचा विकास फक्त अजित पवार यांच्या विजनरी नेतृत्वाचे प्रतीक आहे.याच शहरात परिवार मिलन हा कार्यक्रम अजित पवार यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर डब्बू आसवाणी यांनी अजित पवार यांचे स्वागत केले. पिंपरी चिंचवड शहरवासीय हे अजित पवार यांचा परिवार आहे. पिंपरी येथे अडवाणी धर्मशाळा येथे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी उपमहापौर डब्बू आसवानी यांच्या माध्यमातून हजारो नागरिकांनी अजित पवार यांच्या सोबत संवाद साधला.

तसेच आपल्या समस्या मांडल्या आणि अजित पवार यांनी देखील नेहमीप्रमाणे आपल्या नेहमीच्या शैलीत सर्वांचे समस्या ऐकून घेऊन या समस्यांचे निराकरण करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले.

# पंतप्रधान मोदींच्या जीवन चरित्रावरील माहितीपट व प्रदर्शनी व्हॅनचे उद्घाटन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : - भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू असलेल्या 'सेवा पंधरवडा' अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड शहरात त्यांच्या जीवन प्रवासावर आधारित माहितीपट आणि विशेष प्रदर्शनीचे भव्य आयोजन करण्यात आले. सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ रोजी पिंपरी येथील भाजप शहर मध्यवर्ती कार्यालयात या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले.

या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे व माजी आमदार श्रीमती अश्विनी जगताप यांच्या हस्ते अत्याधुनिक एलईडी व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, माजी प्रदेश सदस्य राजेश पिल्ले, संतोष कलाटे, माऊली थोरात, वरिष्ठ उपाध्यक्ष काळूराम बारणे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, शहर प्रवक्ते कुणाल लांडगे, अभियान संयोजक तुषार हिंगे, विनायक गायकवाड, संजय पटणी, राम वाकडकर, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, हर्षल नढे, सोमनाथ तापकीर, जयदीप खापरे, अजित बुर्डे, रामदास कुटे, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, सुरेश भोईर, संदीप वाघेरे, राजू दुर्गे, रवींद्र देशपांडे, विठ्ठल भोईर, बिभीषन चौधरी, कैलास सानप, अभिजीत बोरसे, युवराज लांडे, गोरक्षनाथ झोळ, दत्ता झुळूक, सतीश नागरगोजे, सचिन राऊत, नंदू कदम, आल्हाट ताई, नीता कुशारे, प्रीतिंसिंह परदेशी, सीमा चव्हाण यांच्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदींच्या जीवन चरित्रावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला, ज्यामध्ये त्यांच्या बालपणातील संघर्षापासून ते गुजरातचे मुख्यमंत्री आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांचा प्रवास उलगडण्यात आला. उपस्थितांनी या माहितीपटाचे कौतुक केले.

यासोबतच, मोदींच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती दर्शवणारी आकर्षक 'प्रदर्शनी' देखील सर्वांसाठी खुली करण्यात आली.यावेळी बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले, "पंतप्रधान मोदींच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या धोरणाने देशाचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यांचे जीवन हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे.

ही एलईडी व्हॅन आणि प्रदर्शनी पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक प्रभागात जाऊन जनतेला मोदींच्या कार्याची माहिती देईल."हे अभियान यशस्वी करण्यासाठी संयोजक तुषार हिंगे, विनायक गायकवाड आणि संजय पटणी यांनी विशेष मेहनत घेतली.

ही एलईडी व्हॅन पुढील पंधरा दिवस शहराच्या विविध भागात फिरणार असून, जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत मोदींच्या जीवन आणि कार्याचा संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579